# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर

## दि.५-५-२००६ चे सर्वसाधारण सभेपुढील चर्चा

विषय क्र.२ - दुखवटयाचे प्रस्ताव.

१) भारतीय जनता पक्षाचे सरचिटणीस आणि जेष्ठ नेते प्रमोदजी महाजन यांचे दुखवटयाचा प्रस्ताव.

सुरवातीस श्री.अनंत जोशी यांनी भारतीय जनता पक्षाचे सरचिटणीस आणि जेष्ठ नेते प्रमोदजी महाजन यांचे दुःखद निधनानिमित्त आज रोजी श्रध्दांजली अर्पण करुन आजची सभा तहकूब ठेवावी अशी सुचना मांडली.

यावर मा.महापौर यांनी ज्या मा.सदस्यांना श्रध्दांजलीपर भाषण करुन श्रध्दांजली अर्पण करावयाची असेल त्यांच्या भाषणानंतर श्रध्दांजली अर्पण करुन नंतर सभा तहकूब करण्यात येईल असे सांगितले.

१) मा.श्री.शंकरराव घुले - आज रोजी तहकूब सभा पुन्हा आयोजित करण्यात आलेली आहे. मा.प्रमोदजी महाजन यांचे दुःखद निधनामुळे श्री.अनंत जोशी, नगरसेवक यांनी जी सुचना मांडली ती यथायोग्य आहे. जन्म-मृत्यु हा दैवाचा खेळ आहे. माणूस आपल्या आयुष्यामध्ये माणूस म्हणून कसा जगला याला अतिशय महत्व आहे. प्रमोदजी महाजन हे ग्रामीण भागातून विशेषतः मराठवाडा विभागातून देश पातळीवर गेलेले होते. महाराष्ट्रामध्ये भाजप शिवसेना युतीचा भगवा झेंडा फडकविण्यामधे त्यांचा सिंहाचा वाटा होता. त्यामुळे महाराष्ट्रामध्ये बिगर काँग्रेसी सरकार येवू शकले. महाजन यांचे कर्तृत्व महान होते. निवडणुकीमध्ये अष्टपैलू व्यक्तीमत्व होते. देशामधे प्रखर हिंदुत्व वादासाठी ते लढले. त्यामुळे सर्व पक्ष त्यांना श्रध्दांजल अर्पण करतीलच. भारत देशामधे रामायण आणि महाभारत याचे आदर्श असताना सख्या भावाने त्यांचेवर हल्ला केला ही अत्यंत दुर्दैवी घटना आहे. मी माझ्या वतीने, हमाल पंचायतीचे वतीने श्रध्दांजली अर्पण करतो.

२) मा.श्री.अशोक कानडे - मा.प्रमोदजी महाजन यांचे दुःखद निधनामुळे दि.२२ एप्रिल ते ४ मे या कालखंडामध्ये वेदना खरोखर दाटुन आलेल्या होत्या. तळागाळातील सर्व सामान्य कार्यकर्ते नागरिक यांचेवर दुःखाची लाट पसरलेली होती. प्रमोदजींचे जिवन हे संपूर्ण जगामधे एक ऐतिहासिक विचार घेउन निघालेले होते. स्वतः प्रमोद महाजन यांचे लिखाण तळागाळातला माणूस समोर ठेवून झालेले होते. त्यांना कुठलेही कौटुंबिक, राजकीय पार्श्वभूमी नसताना त्यांनी समर्थ नेतृत्व केले होते. मराठवाडा विदयापीठ नामांतर प्रश्न महाराष्ट्रामधे चांगली भूमिका घेतली होती. जात पात धर्म यापलिकडे जावून महाराष्ट्राचे एक लाडके उमदे नेतृत्व होते. त्यांच्या कामाच्या पध्दतीचा एकमेव नेता संसदेमध्ये होता. आज जरी ते आपल्यात नसले तरी आत्मा नष्ट होत नाही. त्यांचे कार्य हे प्रेरणा देणारे आहे. समाज, राष्ट्र यासाठी आपण काहीतरी करु शकतो. त्यांचे एक तैलचित्र मनपा सभागृहामध्ये लावण्यात यावे.

३) मा.श्री.कृ.द.जाधव - स्व.प्रमोद महाजन यांचे अलौकिक व्यक्तीमत्व होते. प्रमोदजी महाजन यांचेवर त्यांच्या लहान भावानेच हल्ला केल्याने दुर्दैवी घटना घडली आहे. असा प्रसंग कोणावरही येवू नये. प्रमोदजी महाजन यांच्यासारखा लक्ष्मण आजपर्यंत जगात आलेला नाही. मात्र आजच्या कलीयुगातला लक्ष्मण रामाची हत्या करतो. भाजप शिवसेना गटबंधन केल्याने महाराष्ट्रात

युतीची सत्ता आलेली होती. अशा आदर्श नेत्याचे तैलचित्र मनपात लावणे योग्यच आहे. मी माझ्या वतीने व राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे वतीने श्रध्दांजली अर्पण करतो.

४) मा.श्री.आसाराम कावरे - मराठवाडयासारख्या विभागात प्रमोदजींचा जन्म झाला. एक समर्थ शिक्षक व चांगले पत्रकारही होते. त्यांनी उत्कृष्ट नेतृत्वही केले होते. त्यांचे तैलचित्र सभागृहात लावण्यास मी अनुमोदन देतो.

५) मा.श्री.राजेंद्र चोपडा - शिवसेना भाजपा युतीची सत्ता महाराष्ट्रात आणण्याचे ते खरे शिल्पकार होते. देशामध्ये अत्यंत हुशार, जाणकार व अभ्यासू नेतृत्व होते. त्यांची अशा प्रकारे हत्या व्हावी हे दुर्देव आहे.

६) मा.श्री.सतिष मैड - सतत संघर्ष करणारे नेते अशी त्यांची ख्याती होती. महाराष्ट्र नवनिर्माण सेना यांचे वतीने श्रध्दांजली अर्पण करतो.

७) मा.श्री.दिपक सुळ - प्रमोद महाजन यांचे कर्तृत्व, वर्क्तृत्व व नेर्तृत्व हे महान होते. अशा त्रिवेणी संगमाचा नेता हरपलेला आहे. त्यांच्या दु:खद निधनामुळे केवळ भाजपचेच नव्हे तर महाराष्ट्राचे व देशाचे नुकसान झालेले आहे. त्यांच्या महान स्मृतीस मी श्रध्दांजली अर्पण करतो.

८) मा.श्री.अंबादास गारुडकर - प्रमोदजी महाजन हे ख-या अर्थाने महाराष्ट्राचे तसेच मराठवाडयाचे भूषण होते. त्यांनी आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवला. त्यांच्या दु:खद निधनामुळे महाराष्ट्राचीच नव्हे तर देशाची हानी झाली आहे.

९) मा.श्रीमती.वर्षा आरिफ - माझे वतीने श्रध्दांजली अर्पण करते.

१०) मा.श्री.त्रिपाठी - अंबाजोगाई सारख्या मराठवाडा विभागातील शिक्षकाचा मुलगा भारताच्या नकाशावर पोहोचला. दीनदयाळ उपाध्याय तसेच शामाप्रसाद मुखर्जी यांचा आदर्श ठेवून प्रमोदजी महाजन यांनी आपली वाटचाल केली. सामान्य व्यक्तीच्या खिशामध्ये मोबाईल संस्कृती रुजविली. हे खरे त्यांचे कर्तृत्व आहे.

११) डॉ.सौ.सत्रे - माझ्या वतीने मी प्रमोदजी महाजन यांना श्रध्दांजली अर्पण करते. त्यांचे आदर्श व्यक्तीमत्व अष्टपैलू होते. त्यांच्या दु:खद निधनामुळे महाराष्ट्राची नव्हे तर देशाची हानी झालेली आहे. संपूर्ण देशाचे ते आदर्श नेते होते.

१२) मा.श्री.दीप चव्हाण - प्रमोदजी महाजन यांचा जिवनाचा प्रवास अतिशय ग्रामीण भागातून झाला. शिक्षकाचे कुटुंब पुढे आले. राष्ट्रीय स्वयंसेवक संघामध्ये त्यांनी आपले धडे गिरवले. त्यानंतर पत्रकारिता केली व समाज विकासाचा ध्यास घेवून महाराष्ट्रात तसेच देशाच्या राजकारणात कर्तृत्व आणि नेर्तृत्व केले. प्रत्येकाच्या जीवनात राजकारणात पक्ष म्हणून माध्यम असते. त्याच माध्यमातून त्यांनी आपले कर्तृत्व आणि नेर्तृत्व केले. त्यांच्या दु:खद निधनामुळे सर्व राजकीय पक्षांचे व देशाचे नुकसान झालेले आहे. महाराष्ट्रामधे त्यांची विचारधारा संपलेली आहे. २८ पक्षांना एकत्र घेवून राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे नेर्तृत्व करुन घेण्यामधे व अटलजींना पंतप्रधान करण्यामधे त्यांनी मोठी कामगिरी बजावली. अशा या नेत्याला सर्व पक्षीय श्रध्दांजली अर्पण करुन ही सभा तहकूब करावी अशी विनंती करतो.

१३) मा.श्री.सुनिल कोतकर - मी माझ्या वतीने कोतकर कुटुंबियांचे वतीने तसेच पक्षाचे वतीने श्रध्दांजली अर्पण करतो.

१४) मा.श्री.कैलास गिरवले - प्रमोद महाजन यांचे दु:खद निधनामुळे महाराष्ट्राचे थोर नेते हरपले आहे. व ही दु:खद घटना घडलेली आहे. मला त्यांचा सहवास लाभलेला होता. चांगला योग आलेला होता. या अशा नेत्याचा दुर्देवी अंत होतो ही निश्चीतपणे मनाला वाईट वाटणारी गोष्ट

आहे. त्यांचे विचार प्रखर हिंदुत्ववादी विचाराचे होते. देशाच्या राजकारणामधे सर्व सामान्याचे तसेच शेतक-यांचे प्रश्नही अत्यंत पोटतिडकीने मांडलेले होते. मी त्यांना श्रध्दांजली अर्पण करतो.

१५) मा.श्री.मिलींद गंधे - पुत्र व्हावा ऐसा गुंडा त्याचा तिन्ही लोकी झेंडा, मरावे परी किर्ती रुपी उरावे अशी उक्ती सार्थ करणारे प्रमोदजी महाजन यांनी रामभाउ म्हाळगी प्रबोधीनीमधे चांगले कार्य केले. सर्व सामान्यांच्या दु:खाला वाचा फोडणारा नेता गमावलेला आहे. त्यांना मी श्रध्दांजली अर्पण करतो.

१६) मा.श्री.अनंत जोशी - ज्यांचा आदर्श घ्यावा असे एक आदर्श नेतृत्व, महाराष्ट्राचे युतीचे शिल्पकार व ज्यांनी दिल्लीला वर्चस्व सिध्द केले असे प्रमोदजी महाजन यांच्या स्मृतीस श्रध्दांजली अर्पण करतो.

१७) मा.श्री.नरेंद्र कुलकर्णी - जो आवडतो सर्वाला तोची आवडे देवाला. प्रमोदजी महाजन हे मराठी माणसाचे नेतृत्व होते. त्यांना मी श्रध्दांजली अर्पण करतो.

१८) मा.श्री.वाकळे, विरोधी पक्ष नेते - प्रमोदजी महाजन यांच्या दु:खद निधनाच्या स्मृती कायम रहाव्यात यासाठी अहमदनगर महानगरपालिकेने दरवर्षी ३ मे रोजी प्रमोदजी महाजन यांचे नांवे उत्कृष्ट नगरसेवक पुरस्कार दयावा व त्यास १०००/- रु. बक्षिस दयावे.

१९) मा.श्री.उडाणशिवे - सर्व सामान्य व दिनदुबळया पर्यंत पोहोचणारे प्रमोदजी महाजन यांचे नेतृत्व लाखात एक होते. त्यांचे कार्य दलित मागासवर्गीय अल्पसंख्यांक गटास न्याय देणारे होते. मी राष्ट्रवादी पक्षाचे वतीने व नगरसेवक म्हणून त्यांच्या कुटुंबियांचे दु:खात सहभागी आहे.

२०) मा.श्री.अभय आगरकर - प्रमोदजी महाजन यांचे दु:खद निधनाची वार्ता समजल्यानंतर खरोखर द्विधा मनाची परिस्थिती निर्माण झाली. मराठवाडयासारख्या विभागातून प्रवास करुन मुत्सद्‌दीपणे उत्कृष्ट वर्क्तृत्व शैलीने मार्गक्रमण केले. त्यामधे त्यांना कितीतरी त्रास व अन्याय सहन करावा लागला. त्यांचे दु:खद निधनाची कल्पनाच असू शकत नाही. मी गेल्या आठ वर्षापासून जिल्हा व राज्य पातळीवरील विविध मिटींगमधे, सभेमधे भाषणे ऐकली. ओघवती भाषा, समर्थ नेतृत्व त्यांनी केले व एक राष्ट्रीय नेता म्हणून कर्तृत्व सिध्द केले. पक्षासाठी दिवसरात्र कष्ट केले व आरोप प्रत्यारोपांची तमा न बाळगता कार्य केले. पराभव झाला असेल तर पराभवाची जबाबदारीसुध्दा महाजन यांनी स्वत: स्विकारली. सकारात्मक दृष्टीकोन असणारा नेता आयुष्यात पाहिला नाही. अखिल भारतीय विदयार्थी परिषदेचे काम पहात असताना राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे कामातही पूर्ण वेळ कार्यकर्ता म्हणून परिस्थिती जाणून घ्यावयास पाहिजे. कोणत्याही मानधनाची अपेक्षा न करता जिददीने काम करीत असत. त्यांच्या दु:खद निधनामुळे पक्षाचे व राष्ट्राचे नुकसान झालेले आहे. अमेरिकेनेही या कार्याची दखल घ्यावी असा नेता हरपला आहे. शेतक-यांच्या जीवनामधे परिक्षण करणारा नेता व शेती व्यवसाय हा कारखानदारीत मोडावा असा त्यांचा आग्रह होता. रिडल्स ऑफ हिंदुइझम यात लेखही त्यांनी लिहीले. त्यांचे वागणे दाखला देण्यासारखे आहे.

अहमदनगर महानगरपालिकेच्या वतीने जो मोठा भव्य प्रकल्प उभा राहील त्यास स्वर्गीय प्रमोदजी महाजन यांचे नांव दयावे अशी मी या ठिकाणी सुचना मांडतो. त्यामुळे त्यांच्या स्मृती लक्षात राहतील. भारतीय जनता पक्षाचा महानायक सेनापती यांच्या निधनाचे दु:ख मोठे आहे. त्यांचा विचार आणि आचार संपलेला नाही व संपणारही नाही. कार्यकर्त्यांना एकच विनंती आहे. भाजपच्या प्रमोदजी महाजन यांचा कार्यकर्तृत्वाचा विचार मनात जागरुक व्हावयास पाहिजे. यासाठी प्रामाणीक कार्य करावे व भाजपच्या राष्ट्रीय नेत्याला पाहून कार्य करीत रहावे. हीच खरी श्रध्दांजली आहे.

त्याचप्रमाणे अहमदनगर येथील भारतीय जनता पक्षाचे नेते व महाराष्ट्र राज्य स्वातंत्र्यसैनिक उच्चाधिकार समितीचे सचिव कै.राजाभाउ झरकर यांचेही दु:खद निधनाबद्‌दल मी त्यांना श्रध्दांजली अर्पण करतो. मी त्यांच्या कुटुंबीयांच्या दु:खात सहभागी आहे.

२१) मा.श्री.सुरेश शेळके, सभागृह नेते - महाराष्ट्रातील भारतीय जनता पक्ष व शिवसेना युतीचे शिल्पकार प्रमोदजी महाजन हेच होते. त्यांचे कार्य महाराष्ट्रात नव्हे तर देशपातळीवर पोहोचलेले होते. त्यांना मी माझ्यावतीने व शिवसेनेच्या वतीने श्रध्दांजली अर्पण करतो.

२२) मा.श्री.भगवान फुलसौंदर, महापौर - स्व.प्रमोदजी महाजन यांच्या दु:खद निधनामुळे आजच्या सभेत सर्व राजकीय पक्षांचे वतीने श्रध्दांजली अर्पण करण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे प्रमोदजी महाजन यांच्या चिरंतनस्मृती अहमदनगर शहरात राहून कार्यकर्त्यास त्यांच्याकडून प्रेरणा मिळाव्यात यासाठी अहमदनगर महानगरपालिकेच्या वतीने उभारण्यात येणा-या मिस्कीनमळा वॉटर पार्क या प्रकल्पास त्यांचे नांव देण्यात येईल असे मी जाहीर करतो व माझ्या व शिवसेनेच्या वतीने त्यांच्या स्मृतीस श्रध्दांजली अर्पण करतो.

ठराव :